Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

। सोमवार, दि. ५ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७५ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

शक्तिपीठाला लाख कोटी, शेतकऱ्याला काय?
(पान २ वर)



"जाती-जातींत तणाव निर्माण करण्याचा डाव हाणून पाडा"; प्रा. जोगेंद्र कवाडेंचे आवाहन

आंबेडकरी नेत्यांची जळगावात एकजूट; उपवर्गीकरणाविरोधात महामोर्चा!

डॉ. आनंदराज आंबेडकरांकडून मोर्चाच्या उपस्थितीवर खंत, "जाती-जातींमध्ये तणाव निर्माण केला जातोय"

जन सम्राट टाईम्स

मुंबई । आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून जळगावात रविवारी, ४ ऑक्टोबर रोजी आंबेडकरी चळवळीतील विविध नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकवटले. शासनाच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात लोक संघर्ष समितीतर्फे जनआक्रोश व महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चातून आरक्षणाच्या प्रश्नावर तीव्र विरोध व्यक्त करण्याबरोबरच आंबेडकरी चळवळीतील वाढती गटबाजी, संघटनात्मक विखुरलेपणा आणि तरुणांची भूमिका यावरही नेत्यांनी परखड भाष्य केले.







या महामोर्चाचे संयोजन मुकुंद सपकाळे यांनी केले. मोर्चात रिपब्लिकन सरसेनानी डॉ. आनंदराज आंबेडकर, प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे, बबनराव घोलप, दीपक केदार यांच्यासह विविध मान्यवर सहभागी झाले. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहत आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात आपला रोष व्यक्त केला. मोर्चाला संबोधित करताना प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी शासनाच्या उपवर्गीकरणाच्या भूमिकेवर जोरदार टीका केली. "शासनाचा आरक्षण उपवर्गीकरण करण्यामागे जाती-जातीमध्ये तणाव निर्माण करण्याचा हेतू आहे. हा हेतू हाणून पाडण्यासाठी आंबेडकरी समाजाने सज्ज झाले पाहिजे," असे आवाहन त्यांनी केले. आंबेडकरी चळवळीच्या वर्तमान स्थितीवरही कवाडे यांनी चिंता व्यक्त केली. कालची आंबेडकरी चळवळ ही जिवंतपणाचे आणि संघर्षशीलतेचे लक्षण होती; मात्र आज गटातटांत विभागली गेल्याने तिचे अस्तित्व धोक्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

"तरुणांनो, जागे व्हा. तुम्ही आंबेडकरी चळवळीचे भविष्य आहात," असे आवाहन करत त्यांनी तरुणांनी संघटित होऊन चळवळीला नवी दिशा देण्याची गरज व्यक्त केली.

मोर्चा अपेक्षेइतका भव्य नाही"

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू, रिपब्लिकन सरसेनानी डॉ. आनंदराज आंबेडकर यांनीही आरक्षण उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर आपली भूमिका मांडली. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि मुंबईसह विविध ठिकाणी उपवर्गीकरणाच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर मोर्चे निघाले. त्या तुलनेत जळगावातील मोर्चा अपेक्षेइतका भव्य झाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका घटकाचा नसून सामाजिक न्यायाच्या व्यापक लढ्याशी संबंधित असल्याने त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती आणि संघटन उभे करण्याची आवश्यकता असल्याचा सूर त्यांच्या भाषणातून उमटला. दीपक केदारांनी अन्याय-अत्याचाराला वाचा फोडली अखिल भारतीय पँथर सेनेचे दीपक केदार यांनी आपल्या भाषणातून महाराष्ट्रातील आंबेडकरी समाजावर झालेल्या अन्याय-अत्याचाराच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. सामाजिक न्याय, समानता आणि संविधानिक अधिकारांच्या संरक्षणासाठी आंबेडकरी समाजाने एकजूट राहण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली

केदार यांच्या आक्रमक आणि परखड भाषणाला उपस्थित

कार्यकर्त्यांकडून प्रतिसाद मिळाला. विविध सामाजिक प्रश्नांवर आंबेडकरी समाजाच्या भावना त्यांनी व्यासपीठावरून मांडल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

सुरजभाई सोनवणे यांची लक्षवेधक उपस्थिती

जळगावातील आरक्षण उपवर्गीकरणाविरोधातील महामोर्चात गुजरातचे नेते सुरजभाई सोनवणे यांच्या उपस्थितीकडे आंबेडकरी नेते आणि कार्यकर्त्यांचे विशेष लक्ष होते. त्यांच्या उपस्थितीची मोर्चाच्या राजकीय-सामाजिक वर्तुळात चर्चा रंगली. गुजरातसह महाराष्ट्रातील विविध भागांतील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न या निमित्ताने झाल्याचे दिसून आले.

व्यासपीठावर कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक?

मोर्चाच्या यशासाठी प्रत्यक्ष मैदानात मेहनत घेणाऱ्या काही कार्यकर्त्यांमध्ये मात्र नाराजीचा सूर उमटला. मोर्चाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेऊनही काही कार्यकर्त्यांना व्यासपीठावर अपेक्षित स्थान मिळाले नाही, अशी खंत संबंधित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. "ज्यांनी मोर्चासाठी दिवस-रात्र मेहनत घेतली, त्यांनाच व्यासपीठावर दुय्यम वागणूक मिळाली," अशी भावना काही कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले. या प्रकारामुळे आयोजकांच्या नियोजनाबाबतही काही कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याची चर्चा मोर्चास्थळी होती.

"मागासवर्गीयांसाठी विविध योजना राबवल्या"

माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे यांनी आपल्या मंत्रीपदाच्या कार्यकाळाचा उल्लेख करताना मागासवर्गीय समाजासाठी विविध योजना राबविल्याचे सांगितले. सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या योजनांचा प्रभावी वापर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मोर्चाच्या व्यासपीठावर जगदीश सपकाळे, गुजरातचे भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष भीमराव सैंदाणे, जगन सोनवणे, राजू सूर्यवंशी, धरणगाव शिवसेना मागासवर्गीय सेनेचे तालुकाध्यक्ष मोहन शिंदे, शिवसेना मागासवर्गीय जिल्हाप्रमुख मुकुंदराव नन्नवरे, राजूभाऊ मराठे, मिलिंद सोनवणे, मिलिंद पवार, सुधीर जंजाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लढ्यासोबत संघटनात्मक एकजुटीचे आव्हान

जळगावातील महामोर्चाने आरक्षण उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला असला, तरी या निमित्ताने आंबेडकरी चळवळीसमोरील संघटनात्मक आव्हानेही प्रकर्षाने पुढे आली. एका बाजूला विविध नेते एकाच व्यासपीठावर येत असल्याचे सकारात्मक चित्र दिसले; तर दुसरीकडे कार्यकर्त्यांमधील नाराजी आणि गटबाजीची चर्चा देखील समोर आली. आरक्षणाच्या प्रश्नावर संघर्ष उभा करताना नेत्यांपेक्षा चळवळ आणि कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेवण्याची गरज असल्याचा संदेश या महामोर्चातून पुढे आला. विशेषतः तरुणांनी संघटित होऊन संविधानिक अधिकार आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांसाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले. उपवर्गीकरणाचा मुद्दा आगामी काळात न्यायालयीन, राजकीय आणि सामाजिक पातळीवर अधिक तापण्याची शक्यता असताना जळगावातील या महामोर्चाने आंबेडकरी चळवळीतील विविध गटांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र ही एकजूट केवळ मोर्चापुरती मर्यादित न राहता पुढील आंदोलनांमध्ये आणि संघटनात्मक पातळीवर कितपत टिकते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

MPSC च्या आंदोलनस्थळी येताच गोंधळ, भाषणाला विरोध

जन सम्राट टाईम्स

नाशिक| प्रतिनिधी: शिंदेंच्या शिवसेनेचे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर (Omraje Nimbalkar) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार सहभागी असलेल्या एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलना (MPSC Protest Pune) भेट देऊन पाठींबा दिला. ओमराजे निंबाळकर येताच काही विद्यार्थ्यांनी ओमराजेंची हुर्रे उडवली. अनेक विद्यार्थ्यांनी हुल्लडबाजी केली, गोंधळ घातला. हा सगळा प्रकार पाहता आयोजकांसह आंदोलनात सहभागी असलेला विद्यार्थी विवेकानंद पाटील याने विद्यार्थ्यांचे कान टोचले.विद्यार्थ्यांचा विरोध आणि घोषणाबाजी पाहता विवेकानंद पाटीलने सगळ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ओमराजे आपल्याला पाठिंबा देण्यासाठी आहेत. त्यांची वैयक्तीक राजकीय भुमिका काहीही असो ते आपल्याला पाठींबा देण्यास आले आहेत. आपण त्यांचा मान राखला पाहिजे, असं विवेकानंद पाटील याने सांगितले. सरकारने आधीच आपल्या आंदोलनात फूट



पाडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आंदोलनाला गालबोट लागेल असं काहीही करु नका, सरकारला हेच हवं आहे, असं विवेकानंद पाटील म्हणाला. त्याचप्रमाणे ओमराजेंना पुढील नियोजित दौरा आहे. त्यामुळे त्यांना आता आंदोलनास्थळापासून बाहेर जाण्यासाठी मार्ग मोकळा करा. ओमराजेंना कुठलाही त्रास होता कामा नये. ओमराजे तुम्हाला राग आला असेल तर माफ करा...असं विवेकानंद पाटील म्हणाला. यानंतर ओमराजेंनी लगेच हातात माईक घेऊन..अरे ज्याला आपले मानतात...त्याने आपलेपणाही जपला पाहिजे... असं म्हणत कोणताच राग आला नसल्याचं ओमराजेंनी सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांकडून एकच टाळ्यांचा कडकडाट झाला. मात्र या गोंधळामुळे ओमराजेंना भाषण मात्र उरकतं घ्यावं लागलं. तसेच मोठ्या पोलिस बंदोबस्तात ओमराजेंना बाहेर काढण्यात आलं. ओमराजे निंबाळकर भाषणाला उभे राहताच काही आंदोलकांनी पक्षांतरचा मुद्दा उपस्थित केला. त्याला उत्तर देताना ओमराजे म्हणाले की, ओमराजे असाच ओमराजे झाला नाही. खालून धडका घेऊन इथपर्यंत आलोय. इथे बसलेले विद्यार्थी मला पक्षांतराविषयी बोलले. मी 24 तास मतदारसंघात खपतोय, लोकांची कामं करतोय. सर्वसामान्य माणसाची साथ सोडली नाही. त्या मतदारसंघात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक झाली. पण आमचा एकही उमेदवार निवडून आला नाही.

ऋतुराज गायकवाड OUT, पृथ्वी शॉ बनला महाराष्ट्राचा कर्णधार

नाशिक । हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी महाराष्ट्र क्रिकेट संघात मोठा बदल करण्यात आला आहे. नियमित कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या अनुपस्थितीत अनुभवी सलामीवीर पृथ्वी शॉवर रणजी ट्रॉफीच्या आगामी हंगामातील पहिल्या सामन्यात शॉ कर्णधाराच्या भूमिकेत दिसणार आहे. महाराष्ट्र आणि सर्व्हिसेस यांच्यातील एलिट गट क मधील पहिला सामना 11 ते 14 ऑक्टोबरदरम्यान दिल्लीतील पालम ए स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

शिकलेलीच नाहीत, तर काय कळणार यांना?

जन सम्राट टाईम्स

नाशिक| प्रतिनिधी: सायन्सची जी बुक असते ती मोठी असते, मॅथ्सची जी बुक असते ती पण मोठी असते, पण सिव्हिक्स बुक ज्याच्यात एक नागरिक कसा बनायचा देशाचं ते पुस्तक सगळ्यात छोटं असतं. मुलभूत जबाबदारी काय आहेत याबाबत पब्लिकला अजून थोडी जाणीव नाही. आपल्या व्होटिंगमध्ये सगळा घोळ होत आहे, माहितीच नाही व्होट कशासाठी करायचं. कोणीही येतो म्हणतो धर्म धोक्यात आहे, द्या व्होट. कोणीही येतो म्हणतो तुमची जात धोक्यात, द्या व्होट, त्याच्याने तुमच्या आयुष्यात काय बदललं? तुम्हाला चांगलं शिक्षण भेटणार आहे का? तुमच्या घरापुढचा रस्ता चांगला होणार आहे का? तुमचे पेपर लीक थांबणार आहेत का? आपल्यालाही बदलावं लागेल, असे कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी म्हटलं. दिपके यांनी आज रोहित पवार यांच्या पुण्यातील विद्यार्थ्यांसोबतच्या आंदोलनाला भेट दिली. दिपके यांनी सांगितले की, एवढ्या सगळ्या स्टुडंट्सचं फ्युचर स्टेकवर आहे,काही चुकी होती तर राजीनामा पण द्यायचा नाही? तुम्हाला कशासाठी बसवलं तिथं? मग नुसते हेलिकॉप्टरने फिरायला बसवलं आहे? नुसता आमचा टॅक्सचा पैसा खायला बसवला आहे? अशी विचारणा त्यांनी केली. आता फडणवीस साहेबांनी तर त्यांच्या मित्रांना अध्यक्षपदावर बसवलं. काय क्वालिफिकेशन होतं? फ्रेंड? नाही, फ्रेंड्स विथ बेनिफिट असा टोला त्यांनी लगावला. या फ्रेंड्स विथ बेनिफिटचा फडणवीस साहेबांना किती पर्सन कट भेटला? 50 खोके? यातूनच आमदार आणि खासदार विकले घेतले जात आहेत का मग? कुठून येतोय पैसा? जेव्हा लाडक्या बहिणीला पैसे द्यायचे होते, तेव्हा तुम्ही काय केलं? दुसऱ्यांचे फंड मारले, अशी टीका त्यांनी केली. महाराष्ट्र विकला, सगळं गुजरातला नेऊन ठेवलं. आमचे धंदे कशाला गुजरातला नेतात? तुम्ही स्वतः गुजरातला जाऊन बसा ना? आमच्या इंडस्ट्री कशाला नेऊन ठेवताय तिथे? असा हल्लाबोल त्यांनी केला. अभिजित दिपके म्हणाले, आपल्याला अधिकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिले, पण आता दुर्दैव असं म्हणायचं की आपल्यालाच त्या अधिकारांची कदर नव्हती. त्यांनी आपल्याला तेव्हा ते अधिकार दिले जेव्हा आपल्याला अधिकार काय असतात हेही माहिती नव्हतं. आपण आपल्या फंडामेंटल राईट्सला घेऊन थोडे सेन्सिटिव्ह नाहीये, का? कारण की आयतं भेटलंय ना! संघर्ष नाही करावा लागला, असे त्यांनी सांगितले. सायन्सची जी बुक असते ती मोठी असते, मॅथ्सची जी बुक असते ती पण मोठी असते, पण सिव्हिक्स बुक ज्याच्यात एक नागरिक कसा बनायचा देशाचं ते पुस्तक सगळ्यात छोटं असतं. मुलभूत जबाबदारी काय आहेत याबाबत पब्लिकला अजून थोडी जाणीव नाही. आपल्या व्होटिंगमध्ये सगळा घोळ होत आहे, माहितीच नाही व्होट कशासाठी करायचं. कोणीही येतो म्हणतो धर्म धोक्यात आहे, द्या व्होट. कोणीही येतो म्हणतो तुमची जात धोक्यात, द्या व्होट, त्याच्याने तुमच्या आयुष्यात काय बदललं? तुम्हाला चांगलं शिक्षण भेटणार आहे.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

'आज पाऊल उचलले, उद्या नाईलाजाने हात उचलावा लागेल!'

निवडणूक आयोगाविरोधातील मुंबईतील मोर्चात उद्धव ठाकरे आक्रमक

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विरोधकांकडून मुंबईत काढण्यात आलेल्या मोर्चात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भूमिका मांडली. मतदारयादी, एसआयआर आणि कथित 'मतचोरी'च्या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल करताना त्यांनी "आज पाऊल उचलले आहे, उद्या नाईलाजाने हात उचलावा लागेल," असा इशारा दिला. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप केले. "ज्ञानेश कुमार हे त्यांचं हत्यार आहे," असा आरोप करत त्यांनी मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी लढा सुरू असल्याचे सांगितले. 'उद्या रस्त्यावर फिरणं मुश्किल होईल' निवडणूक आयोगासह विविध संस्थांवर सरकारचा प्रभाव असल्याचा आरोप करत ठाकरे म्हणाले की, न्यायसंस्था आणि प्रशासन ताब्यात घेतले असले तरी रस्ते जनतेच्या मालकीचे आहेत. "आज मत चोरी करायला लागले आहेत, मतदानाचा अधिकारसुद्धा काढून घेत आहेत. पण त्यांना अजून लक्षात आलेलं नाही. हे रस्ते जनतेच्या मालकीचे आहेत. या रस्त्यांवर उद्या तुम्हाला फिरणं मुश्किल होऊन जाईल," असा इशारा त्यांनी दिला. 'बांगलादेशी शोधत असाल तर आकडे दाखवा' एसआयआरच्या मुद्द्यावरूनही उद्धव ठाकरे यांनी सरकारला लक्ष्य केले. एसआयआरचा



उद्देश बांगलादेशी नागरिकांचा शोध घेणे असल्याचे सांगितले जात असल्यास, महाराष्ट्रातील मतदारयादीतील वगळलेल्या मतदारांपैकी किती जण बांगलादेशी आढळले, असा सवाल त्यांनी केला. "महाराष्ट्रामध्ये एसआयआरमध्ये जे दोन कोटी मतदार वगळले त्यापैकी किती बांगलादेशी पकडले? दाखवा. आम्ही त्यांना हाकलून देतो. त्यांना सीमेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आम्ही घेतो; पण सीमा तुमच्या हातात आहेत," असे ठाकरे म्हणाले. 'नागरिकांचा मतदानाचा अधिकार काढणार असाल तर...' बांगलादेशी घुसखोरीच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केला. "बांगलादेशी महाराष्ट्रात घुसतात कसे? देशामध्ये कुणी घुसू दिले? राहू दिले कुणी?" असा सवाल करत भारतीय नागरिकांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला जात असल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा त्यांनी दिला. "बांगलादेशींच्या नावाखाली तुम्ही माझ्या देशाच्या नागरिकाचा मतदानाचा अधिकार काढून घेणार असाल, मग आम्हाला नाईलाजाने आज पाऊल उचलले आहे, उद्या हात उचलावा लागेल," असे ते म्हणाले. पंतप्रधानांवरही निशाणा उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवरही टीका केली. भाजपने देशात मोठे बहुमत मिळवूनही सत्तेच्या काळात लोकांमध्ये सरकारच्या बाजूने बोलण्याची भीती निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. "लोकांना भीती वाटते, पण ती आता यांच्या बाजूने बोलण्याची भीती वाटते," असा टोला त्यांनी लगावला. 'लोक पेटले तर सिंहासन जळून खाक करतील' आपल्या भाषणाच्या अखेरीस उद्धव ठाकरे यांनी हिटलरचा संदर्भ देत सत्ताधाऱ्यांना इशारा दिला. "अजूनही वेळ गेलेली नाही. लोक आज उठले आहेत. उद्या पेटले तर तुमचे सिंहासन जळून खाक करतील," असे ते म्हणाले. हिटलरचे उदाहरण देताना त्याच्या राजवटीतील अधिकाऱ्यांनाही नंतर शिक्षा झाली, असा दावा त्यांनी केला. निवडणूक प्रक्रिया, मतदारयादी आणि एसआयआरच्या मुद्द्यावरून मुंबईतील या मोर्चात विरोधकांनी सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे आगामी काळात हा मुद्दा महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी तापण्याची शक्यता आहे.

शक्तिपीठाला लाख कोटी, शेतकऱ्याला काय?

दुष्काळात निवडणुकांची घाई कशाला;आधी शेतकरी वाचवा, निवडणुका नंतर घ्या - सुप्रिया सुळे

जन सम्राट टाईम्स

सातारा। प्रतिनिधी : राज्यातील अनेक भागांत दुष्काळाची तीव्रता वाढत असताना सरकारने निवडणुकांपेक्षा शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. शक्तिपीठ महामार्गासाठी तब्बल एक लाख कोटी रुपये उभे करण्याची तयारी सरकार दाखवत आहे; मग दुष्काळग्रस्त शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामीण जनतेसाठी निधी उपलब्ध का करून दिला जात नाही, असा सवाल करत सुळे यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. सातारा येथे आयोजित पत्रकार परिषदेत सुप्रिया सुळे बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील उपस्थित होते. राज्यात दुष्काळाचे संकट असताना जिल्हा बँका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याची घाई कशासाठी, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. "राज्यातील शेतकरी पाणी आणि अन्नाच्या प्रश्नाने त्रस्त आहे. ग्रामीण भागातील नागरि
कांसमोर अनेक समस्या आहेत. अशा परिस्थितीत निवडणुका घेण्याची घाई करण्यापेक्षा सरकारने आधी दुष्काळग्रस्तांना मदत करावी, मायबाप जनतेला मदत करा आणि निवडणुका नंतर घ्या," असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही काळ पुढे ढकलण्याची मागणी त्यांनी केली. सध्या राजकीय संघर्ष करण्याची नव्हे, तर संकटात



सापडलेल्या जनतेच्या मदतीसाठी सर्व पक्षांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शक्तिपीठ महामार्गाच्या प्रस्तावित खर्चाचा मुद्दा उपस्थित करत सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "शक्तिपीठ महामार्ग दोन वर्षे उशिरा झाला तर फार मोठे नुकसान होणार नाही. मात्र, पैशाअभावी एखाद्या मुलाचे शिक्षण थांबले, तर त्याचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते," असे त्या म्हणाल्या. सरकारने मोठ्या पायाभूत प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या अडचणींकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, विद्यार्थ्यांची फी माफी आणि सरसकट कर्जमाफी करावी, अशी मागणी त्यांनी केली. रोजगार हमी योजना अधिक प्रभावी आणि बळकट करण्याची गरज असताना त्यामध्ये बदल केले जात असल्याची टीका सुळे यांनी केली. ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार हमी योजना महत्त्वाची आहे. त्यामुळे अशा योजनांमध्ये बदल करण्यापेक्षा त्यांना अधिक निधी आणि बळ देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीचा (डीपीसी) निधी फ्रीज करण्याच्या निर्णयावरही त्यांनी आक्षेप घेतला. जिल्ह्यांच्या विकासासाठी उपलब्ध असलेला निधी रोखल्यामुळे स्थानिक पातळीवरील विकासकामांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली. मतदार यादीतील मतदारसंख्या कमी होण्याच्या प्रकारावरही सुप्रिया सुळे यांनी प्रश्न उपस्थित केला. मतदारसंख्येत झालेल्या बदलांची पारदर्शक पद्धतीने चौकशी झाली पाहिजे. निवडणूक प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी मतदार यादीबाबत निर्माण होणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे स्पष्ट उत्तर मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यात सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचाही सुप्रिया सुळे यांनी उल्लेख केला. आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्याऐवजी सरकारने त्यांच्याशी संवाद साधावा. विद्यार्थ्यांच्या मागण्या समजून घेऊन चर्चेतून मार्ग काढावा आणि दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका करताना सुप्रिया सुळे यांनी, "जिल्हा परिषदांना दमदाटी करण्याची ताकद सरकारकडे आहे; पण त्याच जिल्ह्यातील जनतेला मदत करण्यासाठी वेळ नाही," असा घणाघात केला. सरकारने आधी जनतेच्या प्रश्नांना उत्तर द्यावे आणि संकटग्रस्त शेतकरी, विद्यार्थी व ग्रामीण जनतेला आवश्यक ती मदत करावी, असे त्या म्हणाल्या. दरम्यान, पदवीधर मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा दोन दिवसांत केली जाईल, अशी माहितीही सुप्रिया सुळे यांनी यावेळी दिली. राज्यातील अनेक भागांत दुष्काळाची तीव्रता वाढत असताना सरकारने निवडणुकांपेक्षा शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. शक्तिपीठ महामार्गासाठी तब्बल एक लाख कोटी रुपये उभे करण्याची तयारी सरकार दाखवत आह.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

प्रदीप पूर्णेकर प्रकरणातील थिअरी गोळी रिव्हर्स होऊन टल्ली कनोजियाला लागली?

जन सम्राट टाईम्स



भुसावळ|प्रतिनिधी : ठाण्याच्या मानपाडा, आझाद नगर आणि मनोरमा नगर परिसरातील ठाकरे गटाचे कडवे कार्यकर्ते आणि पदाधिकारी असलेल्या प्रदीप पूर्णेकर यांची गेल्या आठवड्यात मंगळवारी गोळ्या झाडून हत्या (Murder news) करण्यात आली होती. गोळ्या झाडल्यानंतर प्रदीप पूर्णेकर (Pradeep Purnekar) जिवंत होते. त्यामुळे मारेकऱ्यांनी त्यांच्या मानेवर आणि इतर शरीरावर कोयत्याने वार केले होते. यानंतर मारेकरी बाईकवर बसून फरार झाले होते. या घटनेमुळे ठाण्यासह महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ उडाली होती. ठाणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने या हायप्रोफाईल केसच्या तपासाची सूत्रे स्वत:च्या हातात घेत तपासाला सुरुवात केली होती. पोलिसांनी आतापर्यंत पप्या शिंदे, निखिल यादव आणि नितेश पवार या तीन मारेकऱ्यांना अटक केली होती. तर संतोष कनोजिया उर्फ टल्ली अजूनही फरार आहे. तर आणखी एक मारेकरी हा हेल्मेट घालून असल्यामुळे त्याची ओळख पटली नव्हती. या तपासादरम्यान एक वेगळीच शंका पोलिसांच्या मनात एक वेगळीच शंका आली असून त्याद्दष्टीने तपास सुरु असल्याची माहिती आहे. प्रदीप पूर्णेकर यांच्यावर गोळीबार करताना मारेकऱ्यांपैकी एकजण गोळी लागून जखमी झाला असावा, अशी शक्यता पोलिसांना वाटत आहे. प्रदीप पूर्णेकर यांच्या ऑफिसमध्ये मारेकऱ्यांनी रिव्हॉल्व्हरमधून सात राऊंड फायर केले होते. यापैकी चार गोळ्या प्रदीप पूर्णेकर यांना लागल्या होत्या. यापैकी एक गोळी पूर्णेकर यांच्या मानेतून आरपार गेली होती, तर दुसरी गोळी त्यांच्या छातीत अडकली होती. त्यामुळे प्रदीप पूर्णेकर यांचा रुग्णालयात नेण्यापूर्वीच मृत्यू झाला होता. आरोपी पप्या शिंदे याने इशारा दिल्यानंतर इतर चार मारेकरी प्रदीप पूर्णेकर यांच्या कार्यालयात घुसले होते. प्रदीप पूर्णेकर यांचे कार्यालय हे खूपच लहान आहे. दोन किंवा तीन जण बसू शकतील, इतकीच जागा या कार्यालयात आहे. मारेकऱ्यांनी पूर्णेकर यांच्या कार्यालयात शिरताच धडाधड गोळीबार सुरु केला. त्यांनी झाडलेल्या सात गोळ्यांपैकी चार गोळ्या पूर्णेकरांना लागल्या. उरलेल्या तीन गोळ्यांपैकी एका गोळीने मारेकऱ्यांपैकीच एकजण जखमी झाल्याचे पोलिसांना वाटत आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. मारेकऱ्यांनी पूर्णेकर यांच्यावर अत्यंत जवळून गोळीबार केल्याने एखादी गोळी भिंतीवर किंवा दुसऱ्या एखाद्या वस्तूवर आदळून उलटी (रिव्हर्स) फिरली असावी आणि आरोपींपैकी एकाला लागली असावी का, ही शक्यता पोलीस पडताळून पाहत असल्याची माहिती आहे. त्यामुळे मारेकऱ्यांपैकी कोणी जखमी झाले असेल तर मुंबई किंवा ठाणे परिसरातील एखाद्या रुग्णालयात तो गुपचूप उपचार घेत आहे का, याचाही पोलिसांकडून तपास सुरु असल्याची माहिती आहे. मात्र, गोळी रिव्हर्स होऊन आरोपीला लागली असावी ही फक्त एक शक्यता किंवा थिअरीच आहे. त्याबाबत ठोस अशी कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

मातोश्री यमुनाई वृद्धाश्रमात दिव्यांग व ज्येष्ठांना सहायक साहित्याचे वाटप

जिवंतपणी घरातील ज्येष्ठांची सेवा हेच महापुण्य

जन सम्राट टाईम्स



जळगाव । प्रतिनिधी: "जिवंतपणी घरातील ज्येष्ठांची सेवा करणे हेच खरे महापुण्यदायी कर्म आहे. पूर्वजांचा आशीर्वाद मिळाल्यास चारधामासह देवलोकही सदैव प्रसन्न राहतो. निरपेक्ष आणि परोपकारी कार्यासोबत सकारात्मक विचारांची साथ असेल तर आयुष्यात कधीही काही कमी पडत नाही," असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे कार्य सदस्य मुकुंद गोसावी यांनी केले. आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन आणि पितृपक्षाचे औचित्य साधून इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जळगाव यांच्या वतीने धानोरा (ता. चोपडा) येथील कॅ. आण्णासो नारायण पाटील बहुउद्देशीय संस्था संचलित मातोश्री यमुनाई वृद्धाश्रमात १ ऑक्टोबर रोजी विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात गरजू ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व्यक्तींना विविध प्रकारचे सहायक साहित्य मोफत वितरित करण्यात आले. वृद्धापकाळात निर्माण होणाऱ्या शारीरिक मर्यादा आणि दैनंदिन हालचालींमधील अडचणी लक्षात घेऊन व्हीलचेअर, टॉयलेट कमोड, काठी/स्टिक, मान, गुडघा व कंबरेचे पट्टे आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. आवश्यक सहायक साधने मिळाल्याने वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी सुलभ होण्यास मदत होणार आहे. यावेळी मुकुंद गोसावी यांनी उपस्थितांशी संवाद साधताना ज्येष्ठ नागरिकांची सेवा, सामाजिक बांधिलकी आणि निराधार घटकांना मदतीचा हात देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आपल्या मनोगतातून त्यांनी रेडक्रॉस सोसायटीच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहितीही दिली. 'ज्येष्ठ नागरिक समाजाचा अमूल्य ठेवा' संस्थेचे उपाध्यक्ष हुकूमचंद दत्तात्रय पाटील म्हणाले, "ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजाचा अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या अनुभवांचा आदर करणे आणि उत्तरायुष्यात आरोग्य व गतिशीलतेच्या दृष्टीने येणाऱ्या अडचणी दूर करणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. भारत सरकारचा दिव्यांग सक्षमीकरण विभाग आणि रेडक्रॉस सोसायटीच्या माध्यमातून अशा सामाजिक योजना गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे काम सातत्याने केले जात आहे." साहित्य स्वीकारताना वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे भाव दिसून आले. सहायक साहित्याच्या वाटपामुळे वृद्धाश्रमात आपुलकीचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

भाजपची विधानपरिषद यादी जाहीर

पुण्यातून डॉ. स्मिता जाधव, कौस्तुभ गावडे यांना संधी

जन सम्राट टाईम्स



मुंबई: प्रतिनिधी: राज्यातील विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला असून, सर्वपक्षीय मोर्चेबांधणी तीव्र झाली आहे. काँग्रेसपाठोपाठ आता भारतीय जनता पक्षानेही आपल्या वाट्याला आलेल्या तीन जागांसाठी उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. यामध्ये भाजपने पुणे पदवीधर मतदारसंघात मोठा बदल करत धक्कातंत्र अवलंबले असून, इच्छुकांच्या यादीत आघाडीवर असलेल्या शरद लाड यांच्याऐवजी डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपच्या केंद्रीय आणि प्रांतिक पातळीवरील घडामोडींनुसार, विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे हायकमांडसोबत चर्चेसाठी शनिवारी (दि. 3) दिल्लीला गेले होते. तिथे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर या तीनही मतदारसंघांतील नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आणि रविवारी दुपारी ही यादी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. पुणे पदवीधर मतदारसंघ- डॉ. स्मिता योगेश जाधव नागपूर पदवीधर मतदारसंघ- सुधाकर कोहळे पुणेशिक्षकमतदारसंघ-कौस्तुभगावडे पुण्यात धक्कातंत्र पुणे पदवीधर मतदारसंघातून भाजपच्या वतीने शरद लाड यांचे नाव प्रामुख्याने चर्चेत होते आणि ते बऱ्याच दिवसांपासून तयारीही करत होते; मात्र ऐनवेळी पक्षाने धक्कातंत्र वापरत डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी जाहीर केली. नागपूर-पुणे शिक्षक मतदारसंघात यांना उमेदवारी भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला असलेल्या नागपूर पदवीधर मतदारसंघातून माजी आमदार सुधाकर कोहळे यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. या जागेसाठी माजी आमदार अनिल सोले यांच्याही नावाची चर्चा रंगली होती. दुसरीकडे, पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी जाहीर झाली असून, मंत्री चंद्रकांत पाटील आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या नेत्यांनी त्यांच्या नावासाठी विशेष आग्रह धरला होता. या सर्व घडामोडींमुळे आता विधानपरिषदेच्या आगामी निवडणुकीची रंगत वाढली आहे. राज्यातील विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला असून, सर्वपक्षीय मोर्चेबांधणी तीव्र झाली आहे. तीन जागांसाठी उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. यामध्ये भाजपने पुणे पदवीधर मतदारसंघात मोठा बदल करत धक्कातंत्र अवलंबले असून, इच्छुकांच्या यादीत आघाडीवर असलेल्या शरद लाड यांच्याऐवजी डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

जळगाव तालुक्यात नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करा

जन सम्राट टाईम्स



जळगाव। प्रतिनिधी: असमान पाऊस, पावसातील दीर्घ खंड आणि दुष्काळी परिस्थितीमुळे जळगाव तालुक्यातील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा दावा करत नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी तालुका युवासेनेचे स्वप्नील सोनवणे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. महसूल मंत्री बावनकुळे सध्या जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून, पीक नुकसानीचे अचूक पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचे अलीकडील वृत्तांत नमूद आहे. पंचनाम्यांमध्ये शेतकऱ्याची स्वाक्षरी घेण्याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले आहे. 'नुकसान झाल्यानंतर दुसरे पीक घेतले, म्हणून मदत नाकारू नका' निवेदनात सोनवणे यांनी पंचनाम्याच्या प्रक्रियेत निर्माण होऊ शकणाऱ्या एका व्यावहारिक अडचणीकडे लक्ष वेधले आहे. यातच ग्रामीण भागात 'कोरोना'चा शिरकाव वाढला आहे. अतिपावसाने शेतरस्ते खराब आहेत. तेथे सध्या पोचणे शक्य नाही. यामुळे पंचनाम्यांची गती संथ असल्याचे दावे कृषी विभागातील सूत्र करीत आहेत. पंचनामे या आठवड्यात उरकले जातील, असेही सांगितले जात आहे. कारण या आठवड्यात पावसाने उघडीप दिली आहे. पंचनामे करताना गावात शेतकऱ्यांशी एकत्रित संवाद साधणे कठीण आहे. यामुळे पीक पाहणी करून क्षेत्राची माहिती घेतली जाईल.

ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळीला अटक

जन सम्राट टाईम्स



धुळे। प्रतिनिधी: शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांच्यावर सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. MPDA कायद्यानुसार शरद कोळी यांच्यावर सोलापूर ग्रामीण पोलिसांनी स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. त्यामुळे शरद कोळी याला एक वर्षासाठी येरवडा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. आठवडाभरापूर्वीच शरद कोळी यांच्यावर MPDA कायद्यानुसार कारवाईचे आदेश जाहीर करण्यात आले होते. कारवाईचे आदेश जाहीर झाल्यापासून शरद कोळी फरार होते, मात्र काल सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने कोळी यांना सांगलीतून ताब्यात घेतलं. शरद कोळीवर खंडणी मागणे, धमकी देणे सारखे जवळपास 9 गुन्हे दाखल असल्याने MPDA नुसार कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शरद कोळी याला एका वर्षासाठी येरवडा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. अन्वये कारवाई म्हणजे एखाद्या सराईत गुन्हेगाराला किंवा समाजासाठी घातक ठरणाऱ्या व्यक्तीला विना-जमीन थेट तुरुंगात स्थानबद्ध (Detain) करणे होय. हा महाराष्ट्र शासनाचा एक अत्यंत कडक कायदा आहे, ज्याचा मुख्य उद्देश समाजात शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखणे हा असतो. • हा आदेश देण्याचे अधिकार पोलीस आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांना असतात. जो व्यक्ती वारंवार शरीराविरुद्धचे गुन्हे (उदा. मारामारी, खंडणी, खून), अवैध दारू विक्री, वाळू तस्करी, अमली पदार्थांची तस्करी किंवा महिलांची छेडछाड यांसारख्या कृत्यांमध्ये सामील असतो आणि ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होतो. या कारवाई अंतर्गत आरोपीला थेट 1 वर्षासाठी मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध केले जाऊ शकते.शरद विठ्ठल कोळी हे सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपनेते आहेत. ते मूळचे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील अर्धनगरी येथील आहे. 2012 मध्ये ते शिवसेनेत कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी 'धाडस' या सामाजिक संघटनेची स्थापना केली आणि या संघटनेच्या माध्यमातून सोलापूरसह विविध भागांत संघटनात्मक काम केल्याचा दावा त्यांनी केला होता. शिवसेनेत फूट पडल्यानंतर 2022 मध्ये शरद कोळी यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांच्यावर युवासेनेच्या विस्ताराची जबाबदारीही देण्यात आली होती.

नारायणगडावर पुन्हा लाखोंचा मराठा मेळावा

मनोज जरांगेंचं मोठं आवाहन, सरकारसह निवडणूक आयोगावरही हल्लाबोल

जन सम्राट टाईम्स



छत्रपती संभाजीनगर:। प्रतिनिधी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांसह निवडणूक आयोगाच्या कारभारावरही त्यांनी गंभीर आरोप केले. दरम्यान, आगामी दसरा मेळाव्याबाबतही जरांगे पाटील यांनी महत्त्वाची घोषणा केली असून, यंदाचा दसरा मेळावा नारायणगड येथे नियोजित पद्धतीने होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या मेळाव्यासाठी मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत आंदोलन करण्याची भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली होती. मात्र, त्यानंतर त्यांनी मुंबईतील आंदोलनातून माघार घेतली होती. आता दसरा मेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा मोठ्या संख्येने मराठा समाज एकत्र येण्याची शक्यता आहे. दरवर्षीप्रमाणे नारायणगड येथे दसरा मेळावा होणार असल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना या मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. निवडणूक आयोगावर जरांगे थेट निशाणा यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले. सरकार आणि निवडणूक आयोगामध्ये काही प्रकारची मिलीभगत आहे का, असा संशय निर्माण होत असल्याचा दावा त्यांनी केला. ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवून त्यांच्या जागी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करावी, अशी मागणीही त्यांनी केली. निवडणूक आयोगाच्या कारभारावरून जनतेमध्ये नाराजी असल्याचे सांगत त्यांनी सरकारला याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आवाहन केले. निवडणूक प्रक्रियेबाबत निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने पाहिले पाहिजे, अशी भूमिका जरांगे यांनी मांडली. शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाखांची मदत देण्याची मागणी राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही जरांगे पाटील यांनी सरकारला धारेवर धरले. दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत असताना सरकारने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपये मदत देऊन त्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष मदत मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील अनेक भागांत जनावरे आणि पशुपालकांसमोर चाऱ्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने सरकारने गावागावांत चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

‘जयंती 2’च्या माध्यमातून संविधान आणि सामाजिक न्यायाचा जागर OBC, मराठा, आदिवासी व मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी विशेष शो!

चित्रपटाच्या संपूर्ण टीमचा विद्यार्थ्यांशी थेट संवाद

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: आरक्षण, जातीव्यवस्था, मेरिट, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्ये यांसारख्या विषयांवर भाष्य करणाऱ्या ‘जयंती २’ या चित्रपटाचा विद्यार्थ्यांसाठी विशेष शो नाशिक येथील दिव्या सिनेमा येथे भारतीय हितरक्षक सभा, भारत यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. या विशेष शोला OBC, मराठा, आदिवासी आणि मुस्लिम समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे चित्रपटाचे दिग्दर्शक व लेखक शैलेश नरवाडे, प्रमुख कलाकार ऋतुराज तसेच राजकुमार जरांगे आणि चित्रपटाच्या कलावंत व तांत्रिक टीममधील सदस्यांनी विशेष शोला उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी आरक्षण, सामाजिक न्याय, संविधान तसेच चित्रपटातील विविध प्रसंगांबाबत कलाकार आणि दिग्दर्शकांना प्रश्न विचारले. आरक्षण आणि सामाजिक वास्तवाची मांडणी दिग्दर्शक-लेखक शैलेश नरवाडे यांनी आरक्षणाच्या विषयासोबतच जातीव्यवस्था, मेरिट आणि सामाजिक वास्तव यांची मांडणी चित्रपटातून केल्याचे आयोजकांनी सांगितले. सर्वसामान्यांना समजेल अशा पद्धतीने विषय मांडल्यामुळे विद्यार्थ्यांना आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांकडे विविध दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळाल्याचे आयोजकांचे



म्हणणे आहे. चित्रपटातील ‘हर्डल्स’चे उदाहरण, भाकरीचे वाटप यांसारख्या प्रसंगांमधून समान संधी, सामाजिक विषमता आणि आरक्षणामागील सामाजिक संदर्भ मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच जातींचे उपवर्गीकरण, पेपरफुटी आणि परीक्षा पद्धती यांसारख्या समकालीन विषयांवरही चित्रपटातून भाष्य करण्यात आल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद चित्रपट पाहिल्यानंतर विद्यार्थिनींनी चित्रपटातील विषय, मांडणी आणि कलाकारांच्या अभिनयाचे कौतुक केले. आरक्षण, सामाजिक न्याय आणि संविधान यांसारख्या विषयांवर थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. वानखेडे, प्रिया आणि अन्य कलाकारांच्या अभिनयाचाही उपस्थितांनी उल्लेख केला. यावेळी भारतीय हितरक्षक सभा, भारत यांच्या वतीने दिग्दर्शक-लेखक शैलेश नरवाडे, निर्माता, कलाकार तसेच संपूर्ण कलावंत व तांत्रिक टीमचे अभिनंदन करण्यात आले. ‘Certificate of Social Justice’ संकल्पनेवर चर्चा चित्रपटातील ‘Certificate of Social Justice’ ही संकल्पनाही चर्चेचा विषय ठरली. सामाजिक न्याय, समान संधी आणि संविधानिक हक्क यांचा व्यापक विचार समाजासमोर मांडण्यासाठी अशा विषयांवर सार्वजनिक संवाद होण्याची गरज असल्याची भूमिका भारतीय हितरक्षक सभा, भारतने व्यक्त केली. जातीच्या प्रमाणपत्रासोबतच सामाजिक न्यायाच्या व्यापक संकल्पनेचाही विचार व्हावा, अशी भूमिका सभेच्या वतीने मांडण्यात आली. अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष शोचे आवाहन आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विषयावर प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्येही संविधानिक दृष्टिकोनातून चर्चा व्हावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी ‘जयंती २’चे विशेष शो आयोजित करण्याचा विचार करावा, असे आवाहन भारतीय हितरक्षक सभा, भारतच्या वतीने करण्यात आले. चित्रपटाच्या माध्यमातून आरक्षणाची सामाजिक आणि संविधानिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी संवादाचे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते, अशी भूमिका सभेने मांडली. नाशिकमधून महाराष्ट्रासाठी आवाहन २६ सप्टेंबरपासून नाशिकमध्ये OBC, मराठा, आदिवासी आणि मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी ‘जयंती २’चे विशेष शो आयोजित करण्यास सुरुवात झाल्याचे आयोजकांनी सांगितले. नाशिकमधून सुरू झालेला हा उपक्रम महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतही राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक न्याय, आरक्षण आणि संविधान याविषयी संवाद घडवून आणावा, असे आवाहन सभेने केले. संविधानाची प्रस्तावना देऊन कलाकारांचे स्वागत विशेष शोदरम्यान चित्रपटाचे दिग्दर्शक-लेखक शैलेश नरवाडे यांचे सभानायक कॅप्टन कुणाल गायकवाड यांनी संविधानाची प्रस्तावना आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रमुख नायक ऋतुराज यांचे सभानायक कृष्णा शिंदे यांनी संविधानाची प्रस्तावना व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कलाकार राजकुमार जरांगे यांचे सभानायक चंद्रकांत गायकवाड आणि लालचंद शिरसाठ यांनी संविधानाची प्रस्तावना व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. विशेष शोसाठी चित्रपटाच्या टीमने वेळ देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधल्याबद्दल भारतीय हितरक्षक सभा, भारतच्या वतीने संपूर्ण टीमचे आभार व्यक्त करण्यात आले. आयोजनासाठी पदाधिकाऱ्यांचे योगदान विशेष शोच्या आयोजनासाठी सभानायक कृष्णा शिंदे, कॅप्टन कुणाल गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, दिलीप रंगारी, लालचंद शिरसाठ, ममता निकम, अनिकेत चंद्रमोरे, निलेश गांगुर्डे आणि अमोल चंद्रमोरे यांनी विशेष योगदान दिले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

माळेगाव पिंपरी जि.प. शाळेच्या बांधकामाची चौकशी



जन सम्राट टाईम्स

सोयगाव । प्रतिनिधी : येथील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारत बांधकामाच्या दर्जाबाबत ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. बांधकामाच्या ठिकाणी शासन नियमानुसार आवश्यक माहिती फलक लावण्यात आलेला नसल्याचे तसेच अंदाजपत्रकानुसार काम होत नसल्याचा आरोप करत दैनिक जन सम्राट टाईम्सचे प्रतिनिधी शिवराम दगडू जाधव यांनी पंचायत समिती सोयगावकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत गट विकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव यांनी दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी पत्र क्र. जा.क्र.प्रस/बांध/कावि/२०२६/१६१० अन्वये उपअभियंता, बांधकाम उपविभाग, सिल्लोड यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. संबंधित मूळ अर्जावर कार्यवाही करून चौकशीचा अहवाल पंचायत समितीकडे सादर करण्याचे निर्देश पत्राद्वारे देण्यात आले आहेत. तक्रारीत नेमके काय? तक्रारदार शिवराम जाधव यांनी ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी, मौजे पिंपरी येथील जि.प. शाळेच्या नवीन इमारत बांधकामाबाबत माहिती फलकाचा अभाव आणि अंदाजपत्रकाबाहेर अथवा निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याची चौकशी करावी, अशी मागणी केली होती. गट विकास अधिकाऱ्यांच्या आदेशात तक्रारीचा संदर्भ देत संबंधित विभागाने मूळ अर्जावर आवश्यक कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता प्रत्यक्ष तांत्रिक पाहणी आणि चौकशी अहवालातून बांधकामाच्या दर्जाबाबतचे वास्तव स्पष्ट होणार आहे. ‘अंदाजपत्रकानुसार काम होते की नाही, हे समोर येईल’ याबाबत प्रतिक्रिया देताना तक्रारदार शिवराम जाधव म्हणाले, “शाळेच्या कामावर माहिती फलक नसेल तर कामाची माहिती नागरिकांना कशी मिळणार? BDO साहेबांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. आता प्रत्यक्ष काम अंदाजपत्रकानुसार आणि निर्धारित दर्जाप्रमाणे झाले आहे की नाही, हे चौकशीतून समोर येईल.” दरम्यान, चौकशी पूर्ण होण्यापूर्वी संबंधित ठेकेदार किंवा अभियंत्याविरोधात कोणताही निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नसून, तांत्रिक चौकशी अहवालाकडे आता लक्ष लागले आहे. पेमेंटबाबतही ग्रामस्थांची मागणी बांधकामाची तांत्रिक तपासणी करून कामात अनियमितता अथवा निकृष्ट दर्जा आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक माहिती फलक लावून कामाची माहिती सार्वजनिक करावी आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत पेमेंटबाबत नियमांनुसार निर्णय घ्यावा, अशीही मागणी पुढे आली आहे. आता उपअभियंता स्तरावर होणाऱ्या चौकशीत बांधकामाचा दर्जा, अंदाजपत्रकातील तरतुदी, प्रत्यक्ष कामाची स्थिती आणि माहिती फलकाच्या नियमांचे पालन याबाबत काय निष्कर्ष निघतो.

दोन दिवसांपासून पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण; दोन ट्रॅक्टर परत मिळविण्याची मागणी

तक्रार करूनही ट्रॅक्टरचा ताबा मिळाला नसल्याचा सोमा भिल यांचा आरोप

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी : आपल्या मालकीचे दोन ट्रॅक्टर परत मिळावेत तसेच आपल्यावर झालेल्या कथित अन्यायाची चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी सोमा काळू भिल हे भडगाव पोलीस ठाण्यासमोर गेल्या दोन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. सोमा भिल यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी रतन वंजारी यांनी त्यांच्या घरी येऊन जातीवाचक शिवीगाळ करत दोन्ही ट्रॅक्टर घेऊन गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर भडगाव पोलीस ठाण्यात ऑनलाइन तसेच प्रत्यक्ष तक्रार दाखल केल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

तक्रारीनंतर पोलिसांकडून चौकशी करण्यात आली असून संबंधित मुकादम तसेच गावातील काही व्यक्तींशी चर्चा करण्यात आली. त्यानंतर दोन्ही ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात जमा करण्याबाबत सांगण्यात आल्याचा दावा सोमा भिल यांनी केला आहे. मात्र,



संबंधित ट्रॅक्टर अद्याप पोलीस ठाण्यात जमा झालेले नसल्याने आपल्या मालकीच्या वाहनांचा ताबा मिळत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ट्रॅक्टर उपलब्ध नसल्याने आर्थिक नुकसान झाल्याचा दावा ट्रॅक्टर उपलब्ध नसल्यामुळे आपले मोठे आर्थिक नुकसान झाले असून कुटुंबावर आर्थिक संकट निर्माण झाल्याचा दावा सोमा भिल यांनी निवेदनातून केला आहे.

आपण आदिवासी भिल समाजातील असून आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून प्रशासनाने या प्रकरणात तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच, प्रकरणाची चौकशी करून संबंधित कायद्यांनुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही निवेदन या प्रकरणाची माहिती जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, संबंधित कृषी अधिकारी तसेच आरटीओ अधिकारी यांना देण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, गेल्या दोन दिवसांपासून पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण सुरू असल्याने प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, तसेच दोन ट्रॅक्टरबाबत पुढील कायदेशीर कार्यवाही काय होते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे. उपोषणकर्त्याने केलेल्या आरोपांबाबत संबंधित व्यक्ती तसेच पोलीस प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे आरोपांची स्वतंत्र पुष्टी झालेली नाही.

डोच्या आखाड्यात कृष्णा महाजनची विजयी झेप; विभागात अव्वल, राज्यस्तरावर धडक

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । (प्रतिनिधी): क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या वतीने आयोजित विभागीय शालेय ज्यूडो क्रीडा स्पर्धेत इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धरणगावचा विद्यार्थी कृष्णा गोरख महाजन याने दमदार कामगिरी करत विभागस्तरावर अव्वल स्थान पटकावले. कृष्णाने १९ वर्षाखालील ८० किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवत विभागीय विजेतेपदावर आपले नाव कोरले. नाशिक येथील यशवंत व्यायामशाळा, एम.जी. रोड येथे झालेल्या या स्पर्धेत कृष्णाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे कृष्णा महाजनची राज्यस्तरीय शालेय ज्यूडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागीय स्तरावरील यशानंतर आता राज्यस्तरावरही दमदार कामगिरी करण्यासाठी तो सज्ज झाला आहे. कृष्णाला विद्यालयाचे क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक डी. एन. पाटील यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. नियमित सराव आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे कृष्णाने ही उल्लेखनीय कामगिरी केल्याचे सांगण्यात आले. कृष्णाच्या यशाबद्दल विद्यालयाचे चेअरमन डी. जी. पाटील, सचिव सी. के. पाटील, प्राचार्या सुरेखा पाटील, उपमुख्याध्यापक ए. एस. पाटील, पर्यवेक्षिका भारती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कृष्णा महाजन आणि प्रशिक्षक डी. एन. पाटील यांचे अभिनंदन केले. कृष्णाच्या या यशामुळे इंदिरा गांधी विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी कृष्णाला सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या वतीने आयोजित विभागीय शालेय ज्यूडो क्रीडा स्पर्धेत इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धरणगावचा विद्यार्थी कृष्णा गोरख महाजन याने दमदार कामगिरी करत विभागस्तरावर अव्वल स्थान पटकावले. कृष्णाने १९ वर्षाखालील ८० किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवत विभागीय विजेतेपदावर आपले नाव कोरले. नाशिक येथील यशवंत व्यायामशाळा, एम.जी. रोड येथे झालेल्या या स्पर्धेत कृष्णाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे कृष्णा महाजनची राज्यस्तरीय शालेय ज्यूडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



नगराध्यक्षा लिलाताई चौधरी व नगरसेविका ज्योती पाटील यांना समाजभूषण पुरस्कार

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: लिलाताई सुरेश चौधरी तसेच प्रभाग क्रमांक ८ च्या नगरसेविका ज्योती लक्ष्मण पाटील यांना सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत ‘समाजभूषण पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. राष्ट्रीय मानवाधिकार एवं भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय फाउंडेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांच्या वतीने जळगाव येथील पोलीस मल्टीपर्पज हॉलमध्ये रविवारी (दि. ४) राज्यस्तरीय आदर्श शिक्षक, समाजभूषण, कृषिरत्न व कृषीगौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ आणि भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रासह शिक्षण, कृषी आणि समाजसेवेतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेण्यात आली. गरिबी, अत्याचार, शोषण, मानवाधिकारांचे उल्लंघन तसेच पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांबाबत जनजागृती आणि



पीडितांना मदत करण्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात धरणगावच्या नगराध्यक्षा लिलाताई सुरेश चौधरी आणि नगरसेविका ज्योती लक्ष्मण पाटील यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे फाउंडर व प्रेसिडेंट अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी संस्थेचे स्टेट प्रेसिडेंट महाराष्ट्र प्रफुल्ल सीताराम पाटील, महिला प्रदेश अध्यक्ष प्रा. मंदाकिनी नवल भामरे, महाराष्ट्र राज्य महिला उपाध्यक्ष प्रमोदिनी पाटील, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष ईश्वर पाटील, महाराष्ट्र राज्य महिला कार्याध्यक्ष गायत्री सी. पाटील, जळगाव जिल्हा उपाध्यक्ष अर्चना गंभीरराव वाघ, जळगाव तालुकाध्यक्ष भूपेंद्र पुरुषोत्तम बेंडाळे, जळगाव जिल्हाध्यक्ष आर. ए. पाटील, जळगाव शहर महिला अध्यक्ष योगिता रतिलाल पाटील, बुलढाणा जिल्हाध्यक्ष मंदिर हुटेकर, बुलढाणा महिला जिल्हाध्यक्ष रुपाली गायकवाड, बुलढाणा जिल्हा महिला कार्याध्यक्ष सुनीता बाहेकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते राष्ट्रीय मानवाधिकार एवं भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय फाउंडेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांच्या वतीने जळगाव येथील पोलीस मल्टीपर्पज हॉलमध्ये रविवारीआदर्श शिक्षक, समाजभूषण, कृषिरत्न व कृषीगौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

दुष्काळाच्या झळा अन् दिवाळीची चिंता; कासविहिरीत शेतकऱ्यांची व्यथा

बावनकुळेंकडून मदतीचा शब्द, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून दुष्काळग्रस्त पिकांची पाहणी

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धुळे तालुक्यातील कासविहीर परिसरातील दुष्काळग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी महिला शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान आणि त्यातून निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींची व्यथा मांडत दिवाळीपूर्वी आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी केली. दुष्काळामुळे पिके हातातून गेली असून उत्पादनाची अपेक्षा मावळली आहे. अशा परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह, शेतीवरील खर्च आणि कर्जाचा भार यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कासविहीर परिसरातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी थेट महसूलमंत्र्यांसमोर मांडल्या. शेतकऱ्यांची व्यथा ऐकून बावनकुळे यांनी दिवाळीपूर्वी शक्य तितकी मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. पीक नुकसानीचे पंचनामे अचूक आणि वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीबाबत निर्णय घेतला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



बँका, पतसंस्था आणि सावकारांना इशारा दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांवर कर्जवसुलीचा तगादा लावू नये, अशा सूचना प्रशासनामार्फत बँका आणि संबंधित संस्थांना देण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीसाठी त्रास देऊ नये, अशी भूमिका बावनकुळे यांनी यापूर्वीही स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर अनधिकृत सावकारी करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. पंचनाम्यांवर मदतीचा निर्णय दुष्काळग्रस्त भागात सध्या पीक नुकसानीचे पंचनामे आणि परिस्थितीचे मूल्यांकन सुरू आहे. शासनाकडून एनडीआरएफ, एसडीआरएफ तसेच पीक विमा योजनेच्या माध्यमातून मदत उपलब्ध करून देण्याच्या दिशेने कार्यवाही सुरू असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले आहे. कासविहीर परिसरातील शेतकऱ्यांसाठी मात्र आता प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा आहे. दुष्काळाने खरीप हंगाम उद्ध्वस्त केला असताना दिवाळीचा सण तोंडावर आला आहे. त्यामुळे शासनाच्या आश्वासनानंतर मदत नेमकी कधी आणि किती मिळते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धुळे तालुक्यातील कासविहीर परिसरातील दुष्काळग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी महिला शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान आणि त्यातून निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींची व्यथा मांडत दिवाळीपूर्वी आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी केली. दुष्काळामुळे पिके हातातून गेली असून उत्पादनाची अपेक्षा मावळली आहे. अशा परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह, शेतीवरील खर्च आणि कर्जाचा भार यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

दोन वर्षांच्या बालकाचा बळी घेणारा बिबट्या जेरबंद!

जन सम्राट टाईम्स

शिरपूर। प्रतिनिधी: शिरपूर तालुक्यातील अर्थे येथील दोन वर्षांच्या बालकाचा बळी घेणाऱ्या बिबट्याला अखेर वनविभागाने जेरबंद केले आहे. तब्बल २७ दिवसांच्या शोधमोहीमेनंतर वनविभागाला हे यश मिळाले. बिबट्या जेरबंद झाल्याने बोराडीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. ९ सप्टेंबर रोजी अर्थे गावाच्या शिवारात बिबट्याने दोन वर्षांच्या बालकावर हल्ला करून त्याला जबड्यात धरून ठार केल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याचा बंदोबस्त करून त्याला जेरबंद करण्याच्या सूचना वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या होत्या. घटनेनंतर वनविभागाच्या पथकाने परिसरात शोधमोहीम राबवत बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले. विविध ठिकाणी सापळे लावून त्याचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान, भरवाडे शिवारातील पांडुरंग माळी यांच्या शेतात बिबट्या आढळून आल्याची माहिती वनविभागाला मिळाली. माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद करण्यासाठी पथकाने कारवाई केली. उपलब्ध माहितीनुसार, बंदुकीच्या गोळीने बिबट्याला बेशुद्ध करून त्याला ताब्यात घेण्यात आले. २७ दिवसांपासून सुरू असलेल्या या शोधमोहीमेला अखेर यश आल्याने परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. बिबट्या जेरबंद झाल्याने अर्थे, बोराडी आणि पंचक्रोशीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुणे पदवीधर-शिक्षकमध्ये भाजपचे 'कोल्हापूर कार्ड'!

दोन्ही मतदारसंघांत कोल्हापूरचे चेहरे; पुणे, सातारा, सांगली, सोलापूरमध्ये इच्छुकांची नाराजी, महायुतीत बंडखोरीची शक्यता?

जन सम्राट टाईम्स

कोल्हापूर । प्रतिनिधी: महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची घोषणा करताच पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून डॉ. स्मिता योगेश जाधव, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ मुरलीधर गावडे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे, दोन्ही उमेदवारांचे कोल्हापूरशी असलेले निकटचे संबंध पाहता भाजपने दोन्ही जागांवर 'कोल्हापूर कार्ड' खेळल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामुळे दोन्ही जागांसाठी एका जिल्ह्यातील चेहऱ्यांना संधी दिल्याने उर्वरित चार जिल्ह्यांतील इच्छुक आणि स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी उफाळण्याची शक्यता राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून भाजपने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना मैदानात उतरवले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि संस्थेशी जोडलेले शिक्षकांचे व्यापक नेटवर्क त्यांच्या उमेदवारीमागची महत्त्वाची जमेची बाजू मानली जात आहे. गावडे हे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे विश्वासू मानले जातात. दुसरीकडे महाविकास आघाडीतील काँग्रेसने विद्यमान आमदार जयंत आसगावकर यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला आहे. त्यामुळे शिक्षक मतदारसंघात कोल्हापूरशी संबंधित दोन प्रभावी चेहऱ्यांमध्ये थेट लढत रंगण्याची शक्यता आहे.



पदवीधर मतदारसंघासाठी भाजपने डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी दिली आहे. त्या डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू तसेच पुढारी पब्लिकेशनच्या संचालिका आहेत. डॉ. स्मिता जाधव या डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या कन्या आणि पुढारी ग्रुपचे अध्यक्ष योगेश जाधव यांच्या पत्नी आहेत. कोल्हापूरच्या माध्यम, शिक्षण, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात जाधव कुटुंबाचे प्रभावी नेटवर्क असल्याने या उमेदवारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. डी. वाय. पाटील शैक्षणिक समूहाचे पाठबळ आणि पुढारी समूहाचा जनसंपर्क यामुळे भाजपने पदवीधर मतदारसंघात मजबूत सामाजिक-शैक्षणिक समीकरण उभे करण्याचा प्रयत्न केल्याचे मानले जात आहे. या निर्णयामुळे भाजपमधील शरद लाड यांच्यासह अन्य इच्छुकांच्या उमेदवारीच्या चर्चेलाही पूर्णविराम मिळाला आहे. महायुतीत उमेदवारीवरून धुसफूस? भाजपने दोन्ही जागांवर स्वतःचे उमेदवार जाहीर केल्याने महायुतीतील अंतर्गत समीकरणांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील इच्छुकांनी या मतदारसंघांवर दावा केला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ हे कोल्हापूर जिल्हा बँकेचे संचालक भैय्या माने यांच्यासाठी आग्रही असल्याची चर्चा होती. तर शिवसेनेकडून मंगेश चिवटे इच्छुक होते.

मात्र, भाजपने दोन्ही मतदारसंघांवर आपले उमेदवार जाहीर केल्याने महायुतीतील घटक पक्षांच्या इच्छुकांसमोर राजकीय पेच निर्माण झाला आहे. बंडखोरीचे सावट? भाजपच्या निर्णयामुळे महायुतीतील नाराजी निवडणुकीच्या रिंगणात प्रत्यक्ष बंडखोरीच्या रूपात दिसणार का, हा आता सर्वात मोठा प्रश्न ठरला आहे. शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे मंगेश चिवटे, तर पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे भैय्या माने स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. एकीकडे भाजपने संघटनात्मक ताकद, शिक्षण क्षेत्रातील संपर्क आणि कोल्हापूरचे प्रभावी नेटवर्क यांचा आधार घेत दोन्ही जागांवर रणनीती आखल्याचे चित्र आहे. मात्र, पुणे, सातारा, सांगली आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील मतदारांना 'दोन्ही जागा कोल्हापूरलाच का?' असा प्रश्न पडल्यास भाजपसमोर स्थानिक नाराजीचा सामना करण्याचे आव्हान उभे राहू शकते. त्यामुळे भाजपचे हे 'कोल्हापूर कार्ड' निवडणुकीत मास्टरस्ट्रोक ठरणार की महायुतीतील नाराजीचा नवा अध्याय उघडणार, याचे उत्तर आगामी प्रचारात मिळणार आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची घोषणा करताच पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून डॉ. स्मिता योगेश जाधव, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ मुरलीधर गावडे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे, दोन्ही उमेदवारांचे कोल्हापूरशी असलेले निकटचे संबंध पाहता भाजपने दोन्ही जागांवर 'कोल्हापूर कार्ड' खेळल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामुळे दोन्ही जागांसाठी एका जिल्ह्यातील चेहऱ्यांना संधी दिल्याने उर्वरित चार जिल्ह्यांतील इच्छुक आणि स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी उफाळण्याची शक्यता राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून भाजपने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना मैदानात उतरवले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि संस्थेशी जोडलेले शिक्षकांचे व्यापक नेटवर्क त्यांच्या उमेदवारीमागची महत्त्वाची जमेची बाजू मानली जात आहे. गावडे हे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे विश्वासू मानले जातात. दुसरीकडे महाविकास आघाडीतील काँग्रेसने विद्यमान आमदार जयंत आसगावकर यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला आहे. त्यामुळे शिक्षक मतदारसंघात कोल्हापूरशी संबंधित दोन प्रभावी चेहऱ्यांमध्ये थेट लढत रंगण्याची शक्यता आहे. .त्या डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू तसेच पुढारी पब्लिकेशनच्या संचालिका आहेत. डॉ. स्मिता जाधव या डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या कन्या आणि पुढारी ग्रुपचे अध्यक्ष योगेश जाधव यांच्या पत्नी आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

गटस्तरीय क्रीडा स्पर्धेत राजा फांटाच्या मुलींची खो-खोमध्ये हॅट्ट्रिक!



जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी : विविध शालेय क्रीडा स्पर्धा नुकत्याच शासकीय आश्रमशाळा, चुलवड येथे उत्साहात पार पडल्या. १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या खो-खो स्पर्धेत राजा फांटा आश्रमशाळा, पाडामुंड येथील मुलींनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. विशेष म्हणजे, या विजयासह पाडामुंडच्या मुलींनी सलग तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवत खो-खो स्पर्धेत हॅट्ट्रिक साधली आहे. या स्पर्धेत तालुक्यातील विविध आश्रमशाळांच्या संघांनी सहभाग घेतला होता. सुरुवातीपासूनच पाडामुंडच्या खेळाडूंनी चपळता, वेग, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रभावी कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात शासकीय आश्रमशाळा सोन विरुद्ध राजा फांटा आश्रमशाळा पाडामुंड असा सामना रंगला. पाडामुंडच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि नियोजनबद्ध खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व राखले. अखेर दणदणीत विजय मिळवत पाडामुंडच्या संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. संघाची कर्णधार नेहा तडवी हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. तिला अमिषा पाडवी, माधुरी वळवी, सुनंदा तडवी, पार्वती वसावे, गुली तडवी, संजना तडवी, जला वळवी, सीमा तडवी, दक्षता वळवी, बबिता वळवी आणि चंदा वळवी यांनी दमदार सांघिक साथ दिली. या शानदार कामगिरीमुळे पाडामुंड आश्रमशाळेच्या मुलींच्या संघाची प्रकल्पस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, आगामी स्पर्धेत हा संघ धडगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघाला क्रीडा शिक्षक बबन तडवी, चिंतामण वसावे, चेतन तडवी, वनसिंग तडवी, गणेश पाडवी आणि एस. एस. वळवी यांचे मार्गदर्शन लाभले. नियमित सरावासोबतच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दिलेले प्रोत्साहन आणि सहकार्य संघाच्या यशासाठी महत्त्वाचे ठरले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी सांघिक भावना, चपळता, शिस्त, आत्मविश्वास आणि जिंकण्याची जिद्द यांचे उत्कृष्ट दर्शन घडविले. सलग तिसऱ्या विजेतेपदामुळे पाडामुंड आश्रमशाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. विजेत्या संघाचे संस्थाध्यक्ष ॲड. के. सी. पाडवी, खासदार गोवाल पाडवी, सौ. हेमलता पाडवी, जि. प. सदस्या गिताताई पाडवी, मुख्याध्यापक पुष्पेंद्र गिरासे, ईश्वर भावसार, ज्येष्ठ शिक्षक दत्तु पाडवी, केशव मराठे, लिलेश सांळुके,कमलसिंग वसावे, के. के. पावरा, हंसराज वाघ, रमेश साटोटे, प्रविण पाटील, वाड्या वळवी, कागीबाई पावरा, राजुबाई वळवी, हिराबाई भोई, गंगाबाई हुरेज आणि आठुबाई तडवी यांच्यासह पालक, ग्रामस्थ, शिक्षक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून प्रकल्पस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

पिंप्री खुर्द येथील अंगणवाडी पोषण आहार व आरोग्याबाबत जनजागृती

जन सम्राट टाईम्स



धरणगाव। प्रतिनिधी : पिंप्री खुर्द येथील आंबेडकर नगर, सोनवद रोड परिसरातील अंगणवाडी क्रमांक ४१७ येथे आयसीडीएस कार्यक्रमांतर्गत २ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी सेविका अलका बाळकृष्ण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक आहाराचे महत्त्व, संतुलित आहार, स्वच्छता, आरोग्य तसेच बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी आवश्यक पोषणमूल्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बालकांच्या वाढीच्या काळात त्यांना नियमितपणे सकस व पौष्टिक आहार मिळणे आवश्यक आहे. आहारामध्ये विविध पोषक घटकांचा योग्य प्रमाणात समावेश केल्याने बालकांच्या शारीरिक वाढीसोबतच त्यांच्या मानसिक विकासालाही मदत होते, याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. अंगणवाडीच्या विविध उपक्रमांची माहिती अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांची नियमित आरोग्य तपासणी, पूर्वप्राथमिक शिक्षण, पोषण आहार तसेच पालकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. बालकांच्या आरोग्याची योग्य काळजी, स्वच्छतेच्या सवयी आणि संतुलित आहार याबाबत पालकांनी जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले. 'सुदृढ बालक, निरोगी कुटुंब आणि सक्षम समाज' या उद्देशाला बळ देण्याचा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंगणवाडी सेविका अलका बाळकृष्ण पाटील यांनी परिश्रम घेतले. पिंप्री खुर्द येथील आंबेडकर नगर, सोनवद रोड परिसरातील अंगणवाडी क्रमांक ४१७ येथे आयसीडीएस कार्यक्रमांतर्गत २ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी सेविका अलका बाळकृष्ण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक आहाराचे महत्त्व, संतुलित आहार, स्वच्छता, आरोग्य तसेच बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी आवश्यक पोषणमूल्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बालकांच्या वाढीच्या काळात त्यांना नियमितपणे सकस व पौष्टिक आहार मिळणे आवश्यक आहे. आहारामध्ये विविध पोषक घटकांचा योग्य प्रमाणात समावेश केल्याने बालकांच्या शारीरिक वाढीसोबतच त्यांच्या मानसिक विकासालाही मदत होते, याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली.

नाशिक कवीच्या अध्यक्षपदी सुभाष सबनीस!

जन सम्राट टाईम्स



नाशिक। (प्रतिनिधी): नाशिकच्या साहित्यविश्वात कवितेला व्यासपीठ, नवोदित कवींना संधी आणि साहित्यप्रेमींना सातत्याने सृजनशील उपक्रमांची पर्वणी देणाऱ्या 'नाशिक कवी' या संस्थेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी, प्रकाशक व संपादक सुभाष सबनीस, तर कोषाध्यक्षपदी इंजि. अजिंक्य मगर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष इंजि. बाळासाहेब मगर यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या पदांबाबत निर्णय घेण्यासाठी नाशिक कवीच्या कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत सुभाष सबनीस यांची अध्यक्षपदी, तर इंजि. अजिंक्य मगर यांची कोषाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. संस्थेचे कार्यवाह तथा कवी नंदकिशोर ठोंबरे यांनी ही माहिती दिली. नाशिकच्या साहित्यविश्वात 'नाशिक कवी' ही संस्था कवितेची अखंड वाहती सरिता म्हणून ओळखली जाते. ज्येष्ठ कवी शरद पुराणिक यांनी स्थापन केलेल्या या संस्थेशी सुभाष सबनीस पहिल्या दिवसापासून जोडलेले आहेत. कार्यवाह, कार्याध्यक्ष आणि आता अध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळत त्यांचा 'नाशिक कवी'सोबतचा प्रवास दोन दशकांहून अधिक काळ सुरू आहे. सुभाष सबनीस यांच्या साहित्यिक कारकिर्दीचीही मोठी व्याप्ती आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी काव्यसंग्रह, बालकवितासंग्रह, कथासंग्रह तसेच ललित लेखसंग्रह अशा विविध साहित्यप्रकारांतील त्यांची १४ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. गेल्या १६ वर्षांपासून ते 'सुभाषित' या विनोदी दिवाळी अंकाचे संपादक व प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. साहित्य, प्रकाशन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विविध संस्थांच्या माध्यमातूनही त्यांचे कार्य सुरू आहे. कै. बाळासाहेब मगर यांचे चिरंजीव इंजि. अजिंक्य मगर यांनाही वडिलांप्रमाणेच काव्य आणि साहित्याची आवड आहे. ते स्वतःही लेखन करू लागले असून, 'नाशिक कवी'च्या आगामी वाटचालीत त्यांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. संस्थेच्या उपाध्यक्षपदी गझलकार बाळासाहेब गिरी, तर कार्यवाहपदी कवी नंदकिशोर ठोंबरे कायम आहेत. कार्यकारिणीत स्मिता बनकर, अलका कुलकर्णी, अजय बिरारी, किरण मेतकर, भारती देव, राजेश जाधव, प्रांजली आफळे आणि सुरेश चौरे यांचा समावेश आहे.

घोटी-आहुर्ली मार्गे नाशिक बससेवा अखेर सुरू; गायकरांच्या पाठपुराव्याला यश!

जन सम्राट टाईम्स

आहुर्ली । प्रतिनिधी: आहुर्ली-सांजेगाव मार्गे नाशिक हे जिल्ह्याचे शहर जवळ असतानाही या मार्गावरील नाशिककडे जाणाऱ्या काही बसफेऱ्या बंद झाल्याने परिसरातील विद्यार्थी, कामगार आणि नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. अखेर या प्रश्नाची दखल घेत आहुर्ली येथील माजी चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्ते नवनाथ पाटील गायकर यांनी इगतपुरी आगाराकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने या मार्गावर नव्याने बसफेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. शुक्रवार, दि. २ ऑक्टोबरपासून या बससेवेला प्रारंभ झाला असून, त्यामुळे आहुर्ली, सांजेगाव आणि परिसरातील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. वैतरणा येथून सकाळी ६ वाजता आहुर्लीमार्गे नाशिक ही जुनी मुक्काम बसफेरी कायम ठेवण्यात आली आहे. त्यासोबतच नाशिकहून सकाळी ७ वाजता आहुर्ली, आहुर्लीहून सकाळी ८ वाजता नाशिक, दुपारी २ वाजता घोटीहून आहुर्लीमार्गे नाशिक, नाशिकहून दुपारी ३ वाजता आहुर्ली आणि आहुर्लीहून दुपारी ४ वाजता नाशिक



अशा नव्या बसफेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. या बससेवेसाठी सामाजिक कार्यकर्ते नवनाथ पाटील गायकर तसेच सांजेगाव येथील म.वि.प्र. संस्थेचे शिक्षक व कर्मचारी यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आल्याने परिसरातील विद्यार्थी, कामगार आणि नागरिकांना नाशिककडे ये-जा करण्यासाठी अधिक सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रवाशांची गैरसोय दूर आहुर्ली परिसरातील प्रवाशांच्या अडचणी जाणून घेत इगतपुरी आगारातील आगारप्रमुख शेख, अधिकारी ढाकणे, चोपडे व तळपडे आदींनी बसफेऱ्या सुरू करण्यासाठी कार्यवाही केली. बससेवा पुन्हा सुरू झाल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी इगतपुरी आगाराच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले. नवीन बसफेऱ्यांचा विद्यार्थी, कामगार आणि नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.आहुर्ली-सांजेगाव मार्गे नाशिक हे जिल्ह्याचे शहर जवळ असतानाही या मार्गावरील नाशिककडे जाणाऱ्या काही बसफेऱ्या बंद झाल्याने परिसरातील विद्यार्थी, कामगार आणि नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. अखेर या प्रश्नाची दखल घेत आहुर्ली येथील माजी चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्ते नवनाथ पाटील गायकर यांनी इगतपुरी आगाराकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने या मार्गावर नव्याने बसफेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. शुक्रवार, दि. २ ऑक्टोबरपासून या बससेवेला प्रारंभ झाला असून, त्यामुळे आहुर्ली, सांजेगाव आणि परिसरातील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. वैतरणा येथून सकाळी ६ वाजता आहुर्लीमार्गे नाशिक ही जुनी मुक्काम बसफेरी कायम ठेवण्यात आली आहे. सकाळी ७ वाजता आहुर्ली, आहुर्लीहून सकाळी ८ वाजता नाशिक, दुपारी २ वाजता घोटीहून आहुर्लीमार्गे नाशिक, नाशिकहून दुपारी ३ वाजता आहुर्ली आणि आहुर्लीहून दुपारी ४ वाजता नाशिक अशा नव्या बसफेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू!

सोलापूरमध्ये सर्वाधिक ५८ टक्के कमतरता, मराठवाड्यातही चिंताजनक स्थिती

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: राज्यातील पावसाळी हंगाम आता अखेरच्या टप्प्यात पोहोचला असून, महाराष्ट्रातून नैऋत्य मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) ३ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील काही भागांतून मान्सूनने माघार घेतल्याचे जाहीर केले. विशेष म्हणजे, यंदाच्या पावसाळ्यात राज्यातील ३६ पैकी २० जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे मान्सूनच्या परतीसोबतच राज्यातील शेती आणि पाणी व्यवस्थापनासमोरील आव्हानेही वाढण्याची शक्यता आहे. यंदा राज्यात पावसाचे वितरण अत्यंत असमान राहिले. काही जिल्ह्यांमध्ये समाधानकारक किंवा अतिरिक्त पाऊस झाला असला, तरी मराठवाडा आणि राज्याच्या काही भागांत पावसाची मोठी कमतरता जाणवली. IMDच्या आकडेवारीनुसार, सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ५८ टक्के पावसाची तूट नोंदली गेली आहे. त्यापाठोपाठ बीडमध्ये ५१ टक्के, हिंगोलीत ४९ टक्के, जालन्यात ४८ टक्के, अहिल्यानगरमध्ये ४६ टक्के आणि धाराशिवमध्ये ४५ टक्के तूट नोंदवण्यात आली आहे. मराठवाड्यात सर्वाधिक चिंता पावसाच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला आहे. छत्रपती संभाजीनगर वगळता मराठवाड्यातील



सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट नोंदवण्यात आली असून, अनेक जिल्ह्यांमध्ये ही तूट ३४ ते ४९ टक्क्यांच्या दरम्यान आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पेरणी, उपलब्ध पाणीसाठा आणि आगामी शेती नियोजनाबाबत शेतकऱ्यांसमोर प्रश्न निर्माण झाले आहेत. या आकडेवारीमुळे राज्यातील पावसाचे असमान वितरण पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, नाशिक आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये हंगामी पाऊस सरासरीपेक्षा अधिक राहिला, तर मुंबई, ठाणे, पुणे, रायगड आणि रत्नागिरीमध्ये पाऊस साधारण सामान्य श्रेणीत राहिला. महाराष्ट्रातून मान्सूनची माघार वेगाने हवामान विभागाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातून मान्सूनच्या माघारीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. राज्यातील काही भागांतून माघार सुरू झाल्यानंतर पुढील काळात उर्वरित भागांतही मान्सूनची माघार पुढे सरकण्याची शक्यता आहे. पुणे शहरापर्यंतही मान्सूनची माघार पोहोचली असून, यंदाचा हा परतीचा प्रवास अलीकडच्या काही वर्षांच्या तुलनेत लवकर झाल्याचे हवामान विभागाच्या माहितीतून स्पष्ट होते. राज्याची सरासरी तूट १९ टक्क्यांपर्यंत १ जून ते ३० सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सून हंगामात महाराष्ट्रात ८०४.४ मिमी पाऊस नोंदला गेला, तर या कालावधीतील सरासरी पाऊस ९९४.५ मिमी आहे. त्यामुळे राज्यात एकूण सुमारे १९ टक्के पावसाची तूट राहिली. मात्र ही तूट २० टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा कमी असल्याने संपूर्ण राज्याचा मोसमी पाऊस IMDच्या निकषानुसार 'सामान्य' श्रेणीत राहतो. पुढे शेतीसमोर काय आव्हान? मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाल्याने आता शेतकऱ्यांचे लक्ष रब्बी हंगामाकडे लागले आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट आहे, तेथे जमिनीतील ओलावा, विहिरी व धरणांमधील पाणीसाठा आणि रब्बी पिकांसाठी उपलब्ध पाणी यांचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे पावसाची जिल्हानिहाय तूट लक्षात घेऊन प्रशासनाला जलसाठा आणि कृषी नियोजनावर विशेष भर द्यावा लागणार आहे.

पाळधीत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: तालुक्यातील पाळधी येथे श्रीराम ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य, कायदेविषयक अधिकार तसेच सकारात्मक जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक इंजि. विक्रम गुलाबराव पाटील होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना त्यांनी ज्येष्ठ नागरिकांनी दैनंदिन जीवनात आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी, आरोग्यविषयक सूचनांचे पालन करावे तसेच जीवनाकडे सकारात्मक आणि कृतीशील दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. अशोक पवार यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध कायदेविषयक तरतुदी व अधिकारांची माहिती दिली. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंडळाचे सर्वात ज्येष्ठ सदस्य पंढरीनाथ ठाकूर गोरख पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक व मंडळातील सहभागाबद्दल उपस्थितांनी गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार श्रीराम ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष शरदचंद्र कासट यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळातील महिला व पुरुष सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.